**Q.P. Code:00003421**

[वेळ: **३ तास**] [ **गुण**:१००]

**कृपया तुम्हाला योग्य प्रश्नपत्रिका मिळाली आहे का ते तपासा.**

**सूचना: १. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.**

**२. अंतर्गत पर्याय लक्षात घ्यावेत.**

**३. प्रश्नांसामोरील अंक गुण दर्शवतात.**

**प्र.१** अ. 'नापास मुलांची गोष्ट' या ललित लेखसंग्रहातील दया पवार यांच्या यशाची गाथा तुमच्या शब्दात लिहा. **(२०)**

**किंवा**

ब. 'सरगम' या शीर्षकाने समाविष्ट असणाऱ्या सी. रामचंद्र यांच्या लेखनातून प्रकट होणारे संगीत, अभिनय व चित्रपट जगताबद्दलच्या प्रेमाचे रेखाटन करा.

**प्र.२** अ. 'नापास मुलांची गोष्ट' या ललितसंग्रहातील 'दुसऱ्या वेळी पास झालो' या आत्मपर लेखनातील महात्मा गांधी यांच्या शालेय जीवनातील आठवणी रेखाटा. **(२०)**

**किंवा**

ब. 'संगमनेरचे दिवस' या दया पवार यांच्या लेखातील यशासाठी केलेल्या संघर्षाचे चित्रण करा.

**प्र.३** टिपा लिहा. **(कोणत्याही दोन)** **(१०)**

अ. कुसुमाग्रजांचे काव्यप्रेम

ब. शेळके यांचे गणितातील शून्य मार्क

क. चंद्रशेखर धर्माधिकारी यांचे पहिले भाषण

ड. यशवंतराव गडाख यांची यशोगाथा

**प्र.४** अ. अहवालात्मक इतिवृत्त म्हणजे काय ते सांगून त्याचे स्वरूप व लेखनपध्दती स्पष्ट करा. **(१०)**

**किंवा**

ब. 'साधना प्रतिष्ठान', मुंबई या प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित केलेल्या पंचवार्षिक सर्वसाधारण सभेचे वृत्तात्मक इतिवृत्त लिहा.

XJAYANTOYF29872XJAYANTOYF29872XJAYANTOYF29872XJAYANTOYF29872

**Q.P. Code:00003238**

**प्र.५** अ. जाहिरात म्हणजे काय ते सांगून जाहिरातीचा मसुदा/ मचकूर तयार करत असताना कोणकोणत्या गोष्टींचे उपयोजन होते ते स्पष्ट करा. **(१०)**

**किंवा**

ब. दादर येथे नव्याने सुरू झालेल्या अत्याधुनिक वाचनालयाची माहिती देणारी मुद्रित जाहिरात तयार करा.

**प्र.६** **खालील उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(१०)**

भारतीय लोककथांच्या परंपरेत बृहत्कथेला फार महत्त्वाचे स्थान आहे. लोककथासंग्रहाचा हा प्राचीन प्रयत्न असून कथेचे लौकिक स्वरूप कायम ठेवणे हा त्याचा एक महत्त्वाचा विशेष आहे. बृहत्कथेच्या निर्मितीमागील प्रेरणा कथाप्रियतेची होती असे स्पष्ट दिसते. बृहत्कथा प्रथम वररुचीने सांगितली आणि त्याच्या आधी राजांच्या पदरी के कथा सांगणारे असत त्यांच्याकडून काही कथा आल्या. कोणातरी आश्रिताने त्यांची पैशाची भाषेत जुळणी केली. वररुचीनंतर यांनी नवीन कथा त्यात वाढवून ग्रंथ सिद्ध केला असणे संभवनीय आहे. त्यांचा उद्देश नरवाहनचरित आणि उदयनचरित ही दोन्ही चरित्रे सांगण्याचा होता. परंतु या दोन चरित्रांशी संबंध नसलेल्या अशा कथा कितीतरी आहेत. यावरून डॉ. केतकर असे म्हणतात की, या काळातील कथा नरवाहनपूर्व आहेत. ज्या अर्थी नरवाहन हा बुद्धाच्या पूर्वी दोनअडीच शतके होऊन गेला त्याअर्थी हा ग्रंथ बुद्धाच्या पूर्वीच्या अनेक शतकांच्या कथा सांगणारा आहे." उदयनाच्या काळात ज्या कथा सूतवर्गात प्रचलित होत्या त्यांपैकी काही कथा वेगवेगळ्या सांप्रदायिकांच्या हाती लागून कथांचे संग्रह सिद्ध झाले. या सगळ्या कथांचे एकत्र संकलन आणि संपादन वररुचीने केले व असेच दुसऱ्या एका कथेचे संपादन अन्याकडून घेतले. त्यांना 'बृहत्कथा' हे नाव दिले गेले. लोककथेतील अशा कथा ज्या लोकांमध्ये रूढ होत्या त्यांचे लोकांना विस्मरण झाले आणि गुणाढ्याने त्याचे पुनरुज्जीवन केले. डॉ. केतकर यांनी बृहत्कथेसंबंधी विवेचन करताना त्याचे ऐतिहासिक महत्त्व पटवून दिले आहे.

**प्रश्न-**

अ. भारतीय लोककथांच्या परंपरेत कोणत्या कथेला अधिक महत्त्व आहे?
ब. बृहत्कथा प्रथम कोणी सांगितली?
क. बृहत्कथांचे पुनरुज्जीवन कोणी केले?
ड. राजांच्या पदरी कथा सांगणाऱ्या आश्रितांनी कथा सांगताना कोणाची चरित्रे सांगण्याचा प्रयत्न केला?
इ. परिच्छेदास योग्य शीर्षक द्या.

XJAYANTOYF29872XJAYANTOYF29872XJAYANTOYF29872XJAYANTOYF29872

**Q.P. Code:00003238**

**प्र.७** पुढील उताऱ्याचे **सारांशलेखन** करून त्यास योग्य शीर्षक द्या. **(१०)**

स्त्रीने आपल्या स्वातंग्यासाठी चालविलेली चळवळ या यंत्रयुगातील, गेल्या दोन शतकांमधील आहे; पण स्त्रीचे परावलंबन मात्र फार पुरातन असून तिची ही पराधीनता समाजाच्या आणि तिच्याही अंगवळणी पडलेली आहे. आपल्या परवशतेची तिला खंत वाटत नाही; उलट, आपला भार समर्थपणे सांभाळणारा पती तिला पाहिजे असतो. स्वतंत्र पुरुष च त्याच्यावर सर्वस्वी अवलंबून असणारी स्त्री ह्यांच्यात बरोबरीचे नाते निर्माण होण्याची शक्यता नसते, हेही स्त्रीडा उमजत नाही. त्यामुळे 'आपले गौण स्थान हा आपल्याला मिळालेला स्त्रीजन्माचा शाप आहे' असेच मूठभर जागृत स्त्रियांनाही बाटत असते. काही स्त्रियांचा अपवाद वगळता, स्त्रियांना स्वातंत्र्याची गरज भासत नसेल, तर सर्वांना स्वतंत्र करण्याचा अट्टाहास आपण का करावा, आग्रहाने लादलेले स्वातंत्र्य स्त्रिया वापर तील का, असे सार्थ प्रश्न त्यामुळे आपल्याला पडतात. पण 'स्वतंत्र' किंवा 'सुलासीन पण परभृत' अशा दोन प्रकारच्या जीवनांतून एकाची निवड करण्याची सवड स्त्रियांना आता फारशी उरलेली नाही. सुखवस्तू स्थळे काही थोड्या स्त्रियांना लाभतात. तथापि ह्या सुखवस्तू स्त्रियांनाही प्रत्यही निर्णयशक्ती, सारासारविचार, प्रसंगावधान इत्यादी अनेक गुणांची गरज असते.

**प्र.८** पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर **निबंधलेखन** करा. **(१०)**

अ. मी **राष्ट्रपती** झालो तर!

ब. ग्रंथ संग्रहालयाला भेट

क. माझा आवडता सण : दिवाळी

ड. मराठी भाषेवरील माझे प्रेम

XJAYANTOYF29872XJAYANTOYF29872XJAYANTOYF29872XJAYANTOYF29872